

## श्रीसद्गुरू बाबा महाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर

श्रीसद्गुरू बाबा महाराजांचे अंत्यसंस्कार ज्या जागी झाले तेथे शिष्यवर्गाने एक लहानसे मंदिर प्रथम उभे केले होते. श्रीमहाराजांनी दि. १८ ऑगस्ट १९५६ रोजी समाधिस्थानाची जबाबदारी उचलल्यावर त्या जागी एक मोठे समाधिमंदिर उभे केले, मात्र त्या वेळी ते पश्चिमाभिमुख होते व पत्र्यांचा वापर करून उभारलेले होते. एका सुंदर लाकडी देव्हाऱ्यात श्रीबाबांचे सुंदर तैलचित्र स्थापन केलेले होते. श्रीबाबांच्या तैलचित्रासमोर एका मखमली बिछायतीवर मध्यभागी श्रीबाबा, त्यांच्या उजवीकडे श्रीस्वामी समर्थ व डावीकडे श्रीबीडकर महाराज अशा तीन मूर्ती विराजमान होत्या.

संपूर्ण मंदिर तैलरंगाने रंगविलेले होते. आतील बाजूस भिंतींचा खालचा तीन फुटांचा पट्टा हा प्लायवुडने सुशोभित केलेला होता. शिवाय या भिंती उत्सवाच्या वेळी मोकळ्या करून काढण्याची सोय होती. हंड्या, झुंबरे, शोभेचे दिवे, देवादिकांच्या व संत सत्पुरुषांच्या तसबिरी लावून मंदिराची शोभा वाढविलेली होती. उत्सवांच्या वेळी गाभाऱ्याला पॉलीश करून त्यावर रंगीत दिव्यांच्या माळा तसेच 'श्री' आणि 'ॐ' ही अक्षरे लावीत. गाभाऱ्याच्या दोन्ही अंगांना चकचकीत पितळी पत्र्याने मढविलेले चौरंग असत आणि त्यावर अंगारा, तीर्थ आणि सुंठवडा यांचे स्टीलचे डबे असत तसेच व्यवस्थित घडी घालून ठेवलेले रुमाल असत. स्त्रिया आणि पुरुषांसाठी ही वेगवेगळी व्यवस्था केलेली होती.

मंदिराभोवती बाग करून त्यात पूजेसाठी फुले, पत्री, तुळशी, बेल आदी मिळण्याची व्यवस्था केलेली होती. तसेच बागेत भाजीपाला, द्राक्षवेली, ऊस लावलेला होता.

मंदिर आवारात अनेक पाण्याचे हौद बांधून सर्वत्र हातपाय धुण्याच्या सोयी केलेल्या होत्या.

१९५९ साली निवासस्थान बांधून होईपर्यंत श्रीमहाराज या मंदिराशेजारी एक झोपडी बांधून राहिलेले होते.

या मंदिराचा विस्तार एकदा श्रीमहाराज देहधारी असताना करण्यात आला होता. निवासस्थान बांधून झाल्यावर श्रीमहाराज नेहमी म्हणत असत की, मी सिमेंटच्या पक्क्या घरात राहातो आणि बाबा मात्र पत्र्याच्या घरात राहातात. त्याना जे सहज शक्य होते ते त्यानी आपण देहधारी नसताना आपल्या शिष्यांकडून करविले आणि आजचे हे सुंदर मंदिर १९९२ साली उभारण्यात आले.



चरणांच्या शापामुळे व अर्जुन पापमुक्त संपलेले देह
काढल्यामुळे सन १९७२ ते १९८२ पर्यंत विठोबाने सर्व प्रकारे अर्जुन
बाहेरील वागणे असे देह प्रारब्ध कोणत्या प्रकारे वर्णन करता येत नाही.
केवळ श्री सद्गुरु बाबांनी त्याला जगांत आणले असल्यामुळे
तो आज शरीराने जिवंत आहे. विठोबाचे शरीर केवळ मेणाचे आहे.
त्यांतील श्री सद्गुरु बाबा (सोमेश्वर) स्थान वसलेले आहेत, विठोबा
देहात आहे पण ज्ञान-दृष्टीने तो १९८२ मध्ये मरून गेला आहे.
त्याला सद्गुरु शिवाय काही नाही. केवळ त्यांचे श्री सद्गुरूंचा देह
धारण करून आहेत. या देहांत राहून तिहींना येत नाही जर सद्गुरु-
नी जगांत आणले नसते व श्री सद्गुरु रक्षण करते व पाठी राहत नसते
तर स्वर्गवास विठोबा हजीव देह प्रारब्ध अनुसार बाहेर
आलेला झाला असता परंतु जन्मा पासून आजपर्यंत श्री सद्गुरु
होणारे रोज दिवस मला साक्षात आहेत असे पहा असा कोणी
दिसेना येणार.

परमार्थात विठोबाचा अधिकार काय ? हे श्री सद्गुरूंच्या गोष्टी
आलोनुभवी व साक्षात्कारी संत ओळखू शकतील. इतरांने
करणे शक्य नाही. थोडक्यात श्री सद्गुरुंच्या बलवत्तर इच्छे प्रमाणे
विठोबा हा देह जगात ~~[illegible]~~ मात्र ठेवून दिसत आहे.

विठोबाचा स्वतःचा संप्रदाय गुरु परंपरा.

आदिनाथा पासून सुरुवात पुढे, गौडपादाचार्य, गोविंद
पादाचार्य, श्रीमत शंकराचार्य - श्री आद्य शंकराचार्य, वृद्ध
कृष्ण सरस्वती - श्री, मन नृसिंह सरस्वती म्हणजे श्री अक्कलकोट
स्वामि समर्थ महाराज (त्यांचे शिष्य रामानंद बीडकर महाराज (त्यांचे
शिष्य श्रीमत वासुदेवानंद सरस्वती म्हणजे रामचंद्र आप्पाजी सरस्वती
उर्फ श्री सद्गुरु बाबा. हे समर्थ पुढे मग विठोबाचे सद्गुरु





दत्त सागर अवधूत पंथ सरस्वती शाखा, स्वरूप सोम संप्र
विठोबाचे योग पट्टातील नांव सहजानंद सरस्वती श्री स्वामी
समर्थांनी दर्शन दिल्यावेळी साखरे येथे ठेवलेले नांव दिगंबर
दास विठोबा हा केवळ श्री सद्गुरूंच्या चरणांचा पामर दास
आहे. [illegible] आहे. श्री सद्गुरूंचे स्मरण लोपले हो
आजू कोठेही पुण्याई श्री सद्गुरूंचे नामासाठी शास्त्रांचे
वगैरे पडणे नाही. नीती, न्याय, धर्म, शील, कशाचीही पर्वा
नाही केवळ एक सद्गुरूंचे ध्यान आणि नामस्मरण वाचन
सद्गुरूंची सेवा, व श्री सद्गुरूंची आज्ञा पुर्णता हेच विठो-
बाचे जीवन कार्य आहे. विठोबांचा धर्म सद्गुरूंची आदेश
विठोबाला वेद, धर्म, वेद, उपासना, ज्ञान, योग, भक्ति केवळ
कु स्वरूपात सध्यान सद्गुरू वाचूनी देवच नाही हेच त्याचा
नाविन्यात विठोबाच्या जीवनाचे सार आहे याचेशी जास्त
लिहीता येत नाही.

डॉ. [illegible] चरण
[illegible]

# ॥ जननी जन्मभूमिश्च ॥





शांडिल्य गोत्री जोशी घराण्याची एक शाखा मौजे पोमेंडी (बु।।) या गावची खोतीची सनद मिळवून वरवडे, ता. रत्नागिरी येथून येऊन पोमेंडी येथे स्थायिक झाली. त्या कुळातील आठव्या पिढीतील श्री. सखारामपंत जोशी यांचे चिरंजीव विष्णू आणि हरी मोठे कर्तबगार निघाले. त्यांच्यामुळे घराण्याला उर्जितावस्था प्राप्त झाली, शेतीवाडीचा पसारा वाढला. हरिपंतांचा वकिली व्यवसाय बहरला, घराण्यावर लक्ष्मी-सरस्वतीचा वरदहस्त झाला. पोमेंडीला चार घरे बांधली आणि रत्नागिरी येथे दोन !

श्रीमहाराजांचा जन्म पोमेंडीच्या या घरातच दि. १७ ऑक्टोबर १९१२ रोजी झाला. मार्च २००१ मध्ये या घराचा जीर्णोद्धार करण्यात आला. ज्या खोलीत (बाजूच्या चित्रात वर्तुळात दाखविलेल्या) श्रीमहाराजांचा जन्म झाला, तेथे श्रीमहाराजांची भव्य प्रतिमा लावण्यात आली असून घराचा परिसर अत्यंत सुशोभित करण्यात आला आहे. तेथे नित्य प्रातःकाली नामस्मरण, पूजा, त्रिकाल आरती, पंचपदी असे कार्यक्रम पुणे आणि डेरवण येथील स्थानांप्रमाणेच भक्तिभावाने केले जातात. निसर्गरम्य पोमेंडी (बु।।) गावातील गर्द वनराईतील, डोंगराच्या पायथ्याशी वसलेले हे स्थान आता श्रीमहाराजांच्या भक्तगणांसाठी तीर्थस्थान बनले आहे.

▼ जीर्णोद्धारित (मार्च २००१)








▲ श्रीराम मंदिर, पोमेंडी (जुने)

## श्रीराम मंदिर, पोमेंडी

**''विष्णू सखाराम व हरी सखाराम या दोन भावांनी..... श्रीरामाचे देवालय बांधले. चैत्रात रामनवमी उत्सव १० दिवस एक हजार पान जेवत असे. चैत्र शु. प्रतिपदा ते शु. एकादशी पर्यंत रामनवमीचा उत्सव असे. अश्विन महिन्यात एक महिना काकड आरती असे.''** (श्रीमहाराजांच्या हस्तलिखितातून)

पोमेंडीला श्रीमहाराजांच्या घराशेजारीच असलेल्या या मंदिरात श्रावण व॥ एकादशी शक १७६८ या दिवशी श्रीराम, श्रीसीतामाई, श्रीलक्ष्मण आणि श्रीहनुमान या अतिशय देखण्या, शुभ्र संगमरवरी मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. या मूर्ती खास राजस्थानातून आणण्यात आल्या. तेव्हापासून येथे रामनवमीचा उत्सव चैत्र शु॥ १ ते ९ असा नऊ दिवस मोठ्या प्रमाणावर दरवर्षी साजरा होत असे व दशमीला पारणे होत असे. त्या काळी राम–जन्मानंतर रामाची पालखी गावातील श्रीमहालक्ष्मी आणि श्रीरामेश्वराच्या मंदिरात जात असे.

बालवयापासून श्रीमहाराज श्रीरामाची पूजा–अर्चा, ध्यानधारणा यात रंगून जात. श्रीहनुमंताच्या साक्षीने बलोपासना करीत. श्रीमहाराजांचा निस्सीम भाव पाहून श्रीराम त्यांच्याबरोबर धनुष्यबाण घेऊन खेळू लागत. श्रीमहाराजांनी तरुण वयात मंदिरात उत्सव प्रसंगी कीर्तनसेवा रुजू केली. श्रीमहाराजांच्या प्रेरणेने १९९४ साली या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला.



▼ श्रीरामेश्वर मंदिर, पोमेंडी



▼ श्रीराम मंदिर, पोमेंडी (जीर्णोद्धारित १९९४)



श्रीसोमेश्वर मंदिर




श्रीमहाराजांच्या आजोळचे, पुरातन स्वयंभू शिवलिंग असलेले हे श्रीसोमेश्वर मंदिर श्रीमहाराजांचे श्रद्धास्थान होते. तीन दिशांना तीन भव्य ओसऱ्यांसह प्रवेशद्वारे, सभागृह आणि गाभारा असलेले कौलारू छपरांचे मंदिर, आतील वैशिष्ट्यपूर्ण नक्षीदार तुळया आणि लाकूडकाम, मंदिरासमोरील उंच दीपमाळा, जांभ्या दगडाने मढविलेले आवार आणि सभोवारची उंच भक्कम भिंत या साऱ्यांनी मंदिराचे प्राचिनत्व आणि सौंदर्य अधोरेखित होते. आपापसातील मतभेदांमुळे बंद पडलेले या मंदिरातील वार्षिक उत्सव, श्रीमहाराजांनी स्वतः पुढाकार घेऊन पुन्हा चालू केले.

श्रीमहाराज सांगत असत की पुढे भविष्यकाळी समुद्र आपली मर्यादा उल्लंघेल आणि किनाऱ्यावरील गावे गिळंकृत करील. मात्र सोमेश्वर पाण्याखाली जाणार नाही, कारण मीच सोमेश्वर आहे !



श्रीमहाराजांचे आजोबा श्री. नारायण दाजी सोवनी यांचे मौजे सोमेश्वर, ता. रत्नागिरी येथे काजळी नदीच्या काठावर घर आहे. हे श्रीमहाराजांचे आजोळ. बालपणी श्रीमहाराज वारंवार आजोळी जात, परंतु वडिलांच्या मृत्यूनंतर तेराव्याच दिवशी श्रीमहाराज घरात भांडणे झाल्यामुळे आजोळी, या घरी राहायला गेले. ते तेथे सहा महिने होते. मग पुन्हा पोमेंडीला येऊन घरी शेतीवाडी, घरची व्यवस्था पाहू लागले. परंतु सावत्र भावांशी मतभेद झाल्यामुळे श्रीमहाराज मावशी आणि मामांच्या साहाय्याने मुंबईला १९३४–३५ साली निघून गेले. तेथेही श्रीमहाराजांना आजोळच्या नातेवाईकांचा प्रेमळ आधार होता. श्रीमहाराजांनी दत्ता सोवनींच्या मुंजीमध्ये स्वरचित मंगलाष्टक गाईले ते या सोमेश्वरच्याच घरी !

श्री. नारायण दाजी सोवनी यांचे घर



**चि. काशीनाथ महादेव जोशी याच्या व्रतबंध प्रसंगी जमलेल्या कुटुंबीयांसमवेत श्रीमहाराज**

१) विनायक श्रीधर २) शंकर रामकृष्ण सहस्रबुद्धे ३) विनायक काशीनाथ काळे ४) महादेव गणेश ५) वामन श्रीधर ६) विठ्ठल गणेश (श्रीमहाराज) ७) श्रीधर हरी ८) नारायण गणेश
९) कृष्णाजी दत्तात्रेय भावे १०) विष्णू श्रीधर ११) बावा जोगळेकर ११अ) सौ. पार्वती पाले (मोलकरीण) १२) रामचंद्र लक्ष्मण १३) सौ. अंबुमावशी १४) सौ. लक्ष्मी लिमये १५) सौ. कमल शंकर सहस्रबुद्धे
१६) अन्नपूर्णाबाई पर्शुराम फडणीस १७) बटू चि. काशीनाथ महादेव १८) सौ. गिरीजा महादेव १९) सौ. सत्यभामा श्रीधर २०) कु. कुंदा श्रीधर २१) सौ. इंदिरा नारायण २२) सौ. पटवर्धन २३) सौ. शांता जोगळेकर
२४) मनोहर नारायण २५) कु. वत्सला नारायण २६) कु. वासंती श्रीधर २७) कु. कमल महादेव २८) अरविंद श्रीधर २९) कु. सुमन गणपत पटवर्धन ३०) कु. उषा नारायण ३१) कु. विमल श्रीधर
३२) महादेव गणेश पटवर्धन ३३) कु. इंदुमती महादेव ३४) कु. शकुंतला नारायण ३५) कु. सुशीला महादेव ३६) यशवंत नारायण ३७) बनी शिंदे (मोलकरीण)